# जिल्हा सामान्य रुग्णालय,सिंधुदूर्ग-सिंधुदूर्गनगरी

दुरध्वनी क्र .०२३६२-२२८६५४ (जि.श.चि),२२८९०२ (कार्यालय)
२२८१९७ (एनआरएचएम कक्ष),
e mail – cssindhudurg@yahoo.co.in, emscosindhudurg@gmail.com


जिरुसिं/एनएचएम/ईएमएस/3191 /२०२६ दि.25/2/२०२६

## दरपत्रक सुची

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय सिंधुदूर्ग अंतर्गत येथे_रेफरल ट्रान्सपोर्ट कार्यक्रमांतर्गत रुग्णवाहिका वाहनचालक JSSK करीता एकूण ६ शासकिय संस्थेमध्ये ६ पदे बाहयस्त्रोत संस्थेद्वारे भरणेकरिता मार्गदर्शक सूचना प्राप्त आहेत. सदरची बाहयस्त्रोत संस्था निश्चित करणेकरिता दरपत्रक पध्दतीने करणे प्रस्तावित आहे.

पुरवठादाराकडुन खालील अटीच्या अधिन राहुन मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. अटीची पूर्तता करणाऱ्या पुरवठादारांपैकी दरपत्रके खाली सही करणार यांच्या नावे दिनांक ०४ /०3 /२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय सिंधुदूर्ग अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान सिंधुदूर्ग येथे आणुन देणेचे आहे. सदर दरपत्रके दिनांक ०४/ ०3/२०२६ सायंकाळी ४.०० वा. उघडण्यात येतील.

**अटी व शर्थी –**

१) नियुक्त सेवा सोसायटीने, जिल्हा शल्यचिकित्सक, सिंधुदूर्ग यांचे नावे करारपत्र रु.१००/- गैरन्यायिक बंधपत्रावर तयार करुन घेणेचे आहे.

२) सबंधित संस्थेचे नोंदणीपत्रक, पॅनकार्ड व आवश्यक ते सर्व पात्रतेचे निकष पूर्ण असणे आवश्यक आहेत. तसेच पात्रते सबंधी सर्व विहित कागदपत्रे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

३) नियुक्त सोसायटीने नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाला किमान वेतन कायद्याद्वारे, धनादेशाच्या माध्यमातून रोजंदारी देणे बंधनकारक आहे. तसेच Employee Providend fund, Employee State insurance Corporation, Professional Tax याबाबत कायद्यानुसार पूर्तता करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

४) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

५) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्ती प्रकृतीने निरोगी व सुदृढ असणे आवश्यक आहे.

६) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तीकडुन सदरचे करारपत्र हे कार्यआदेश दिलेनंतर उमेदवार हजर होईल त्यादिवशी मुळप्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.

७) कामाची वेळ २४ तास राहिल. एकूण ६ शासकिय संस्था येथे काम करावे लागेल.

८) उमेदवाराला कामावर येणेजाणेचा खर्च तसेच अन्य भत्ते शासनाकडुन देय नाहीत.

९) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीने महिन्यातील प्रत्यक्षात काम केलेले दिवस व स्विकृत दर यांचा गुणाकार करुन प्रत्यक्ष येईल त्या रकमेचे देयक अदा करणेत येईल.

१०) कामाचे देयक, ईपीएफ भरणा केल्याची पावती, भरणा केल्याचे चलन व सफाई कामगारांचे हजेरीपत्रक दर महिन्याचे २ तारखला जिल्हा शल्यचिकित्सक, जि.रु.सिंधुदूर्ग यांचे नावे मूळ प्रतीत सादर करणे बंधनकारक राहील.

११) देयक अदा करताना शासकिय प्रचलित नियमानुसार करवजावटी करणेत येतील.

१२) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीने काम सोडलेस त्याची पर्यायी व्यवस्था २४ तासांत करावी विलंब १ आठवडयापेक्षा जास्त झालेस प्रति आठवडा ०.५ टक्के एवढी कपात देयकातून करणेत येईल आणि चार आठवडयानंतर कार्यआदेश संपुष्टात येतील.

१३) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीला शासकिय सेवेसाठी अगर इतर कोणत्याही शासकिय हक्कासाठी दावा करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१४) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्ती स्वच्छ चरित्र असलेली असावी, ती गुन्हेगारी पार्श्वभूमीची असू नये.

१५) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक, सौजन्यपूर्ण वर्तणूकए नेमून दिलेले काम वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे.

१६) संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्तीला कामावर येतांना व जाताना कोणताही अपघात अगर तत्सम इजा किंवा दुखापत झालेस त्याची जबावदारी ही कंत्राटदाराची राहील. यावर शासन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणार नाही.

१७) कार्यआदेश दिलेपासुन ७ दिवसात मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेने नियुक्तीपत्र देऊन मनुष्यबळ पाठविणेचे आहे.

१८) कामाची मुदत संपलेनंतर कोणतीही स्वतंत्र सुचना न देता कार्यआदेश संपुष्टात येतील.

१९) सेवा पुरविणेचा कालावधी हा मनुष्यबळ हजर झालेल्या दिनांकापासुन राज्य आरोग्य सोसायटी मार्फत पुढिल सूचना किंवा ३० सप्टेंवर २०२६ यापैकि जो कमी कालावधी असेल तो ग्राहय धरला जाईल

२०) मनुष्यबळ पुरविणेची संख्या सहा राहील. याबाबत आवश्यक सर्व बदलावावतचे अधिकार जिल्हा शल्यचिकित्सक, सिंधुदूर्ग यांचेजवळ राहतील. यावावत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही अगर न्यायालयात जाता येणार नाही.

२१) दरपत्रकातील दर हे सर्व करांसहीत असावेत.

२२) GST क्रमांक नसल्यास तसे स्वयंघोपणापत्र दरपत्रकासोवत जोडण्यात यावे.

जिल्हा शल्यचिकित्सक
सिंधुदुर्ग
District Civil Surgen,
Sindhudurg